सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १४९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनिरुहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री पंकजाताई मुंडे जालन्यात

### विविध विकासकामांचे लोकार्पण, आढावा बैठका

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथ मुंडे या प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. पालकमंत्रीपद स्वीकारल्यानंतर जालन्यात त्यांचा प्रत्यक्ष दौरा कमी असल्याने जिल्ह्यात नाराजीचे सूर उमटत होते. अशा परिस्थितीत प्रजासत्ताक दिनी होणारा हा दौरा राजकीय तसेच प्रशासकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.



जालना जिल्ह्यातील विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन, लाभार्थ्यांना वाटप, तसेच महत्त्वाच्या आढावा व नियोजन बैठकींना त्या उपस्थित राहणार असल्याने संपूर्ण दिवसाचा कार्यक्रम भरगच्च ठेवण्यात आला आहे. त्यामुळे ''पालकमंत्री अवतरणार'' अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

सकाळी ध्वजारोहण व शासकीय कार्यक्रम

सोमवारी सकाळी ९.१५ वाजता जालना येथील पोलीस परेड ग्राऊंडवर पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनाचा शासकीय ध्वजारोहण सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी त्या परेडचे निरीक्षण करून उपस्थितांना शुभेच्छा संदेश देतील.

यानंतर प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलांचे वाटप तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्ती, कर्मचारी व संस्थांना पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

विकासकामांचे उद्घाटन व उपक्रम

दुपारच्या सत्रात पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत खालील महत्त्वाचे उपक्रम पार पडणार आहेत सकाळी ११.२० वाजता भोकरदन नाका येथे जालना महानगरपालिकेच्या भटके श्वान केंद्राचे उद्घाटन. दुपारी १२.00 वाजता बसस्थानक परिसरात सीना-कुंडलिका नदी पात्र स्वच्छता अभियानाचा शुभारंभ सामनगाव येथे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्घाटन. दुपारी १.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना हार्वेस्टर, ट्रॅक्टरचे वाटप तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत निवड पत्रांचे वितरण.

**जिल्हा नियोजन समितीची महत्त्वाची बैठक**

दुपारी १.३० ते ३.३० या वेळेत जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या बैठकीत जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेऊन आगामी कामांसाठी दिशा ठरवण्यात येणार आहे.

**भूमिपूजन व भेटी**

मोतीबाग येथील छत्रपती संभाजी उद्यानाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन तसेच नागेवाडी येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातील मॅजिक इनक्युबेशन कौन्सिल सेंटरला पालकमंत्री भेट देणार आहेत.

**छत्रपती संभाजीनगर दौरा व मुंबईकडे रवाना**

जालन्यातील कार्यक्रमानंतर सायंकाळी ५.३० वाजता पालकमंत्री छत्रपती संभाजीनगर येथे पोहोचतील. सायंकाळी ५.४५ वाजता उल्कानगरी येथील पन्नाज क्रिएशन बुटीक सेंटरचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. रात्री ८.३० वाजता त्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून इंडिगो विमानाने मुंबईकडे रवाना होतील.

**सुरक्षा व्यवस्था कडक**

पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना '++' दर्जाची सुरक्षा पुरवण्यात आली असून, दौऱ्यादरम्यान निवडणूक आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या दौऱ्याची माहिती सर्व लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व संबंधित यंत्रणांना देण्यात आली आहे.

## क्षत्रिय मराठा भवनावर परप्रांतीय बिल्डरचा डोळा!

### विश्वस्तांच्या संगनमताचा आरोप

### चौकशी करुन कारवाईची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी -** गिरगावमधील नवलकर लेन येथील अखिल भारतीय मराठा महासंघाची मोक्याच्या ठिकाणची ऐतिहासिक जागा एका परप्रांतीय बिल्डरने बेकायदेशीरपणे बळकावण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. संस्थेच्या काही विश्वस्तांनी सभासदांना अंधारात ठेवून, बनावट कागदपत्रांच्या आधारे हा व्यवहार केल्याचा दावा पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

**ऐतिहासिक वारसा धोक्यात**

अखिल भारतीय मराठा महासंघ ही १२५ वर्षे जुनी संस्था आहे. १९१४ मध्ये मराठा न्याती समाज ट्रस्ट या नावाने कार्यरत असताना, समाजातील सभासदांनी पदरमोड करून गोळा केलेल्या २५,000 रुपयांच्या देणगीतून गिरगावची ही वास्तू खरेदी केली होती. मराठा समाजाच्या अनेक ऐतिहासिक लढायांची ही वास्तू साक्षीदार राहिली आहे. मात्र, आता हा वारसाच धोक्यात आला आहे.

**बनावट कागदपत्रांचा आधार**

मिळालेल्या माहितीनुसार, संस्थेच्या दोन विश्वस्तांनी आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करून आणि परप्रांतीय बिल्डरच्या आर्थिक पाठबळावर हा व्यवहार रेटला आहे. धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाची मुदत संपलेली असतानाही, मुंबई महानगरपालिका () आणि म्हाडा () येथे दिशाभूल करणारी कागदपत्रे सादर करून विविध परवानग्या मिळवण्यात आल्याचा आरोप आहे.

**सभासदांचा तीव्र विरोध**

हा व्यवहार अत्यंत गुप्तपणे पार पाडण्यात आला. मात्र, ही बाब लक्षात येताच महासंघाच्या सजग मराठा विरोधक करत आहेत. पैशाच्या आणि सत्तेच्या जोरावर ही जागा बळकावण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही,'' अशी भावना संघटनेच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. मुंबईतून मराठा समाजाचे अस्तित्व संपवण्याचे हे षडयंत्र असल्याचा संतप्त आरोपही यावेळी करण्यात आला. या प्रकरणाची




सभासदांनी आणि पदाधिकाऱ्यांनी याविरोधात आवाज उठवला आहे. याबाबत धर्मादाय आयुक्त, पालिका प्रशासन आणि म्हाडाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.


''ज्या पूर्वजांनी एक-एक पै गोळा करून मराठा समाजासाठी मुंबईत हक्काचे ठिकाण उभे केले, ती साक्ष पुसण्याचा प्रयत्न काही सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी संपर्कप्रमुख छत्रपती संभाजी नगर अखिल भारतीय मराठा महासंघ अशोक पडूळ, जालना जिल्हा सरचिटणीस संतोष कराळे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण , मंगेश मोरे, अॅड् शैलेश देशमुख, श्रीकृष्ण यादव, बाळासाहेब देशमुख, यांनी केली आहे.


युवा आदर्श

### प्रजासत्ताक परेड...

**प्रजासत्ताक उत्सव**
**पहा दिल्ली प्रत्यक्ष**
**दैदिप्यमान सोहळा**
**दिपून जातात अक्ष**
**सतर्क यंत्रणेत गर्क**
**सुरक्षा व्यवस्था दक्ष**
**त्रिदल सदा सुसज्ज**
**सेवेत असे निरपेक्ष**
**राजपथ संचलनात**
**अभिमाने फुले वक्ष**
**रथ विविध राज्यांचे**
**देतात संस्कृतीसाक्ष**
**विहंगम देखेदेखावा**
**विसरे धर्मजात पक्ष**
**रोषणाई मनमोहक**
**धरतीवर ये अंतरिक्ष**
**रे रोमहर्षक कसरती**
**भयचकीत रे गवाक्ष**
**अलौकिक रंगसंगत**
**साफल्य होती औक्ष**
**प्रगतीपथावर भारत**
**प्रचिती उभी समक्ष**
**समारोह भव्य दिव्य**
**वेधतो जगताचे लक्ष**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.



२६ जानेवारी गणतंत्र दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय या ऑफिसांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे (छायाचित्र किरण खानापुरे)

## प्रश्न मंजुषा स्पर्धेत विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवला प्रथम क्रमांक



**परतूर । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालय परतुर येथे शुक्रवार, दि. २३ जाने. रोजी स्वातंत्र्यसेनानी आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त प्रश्न मंजुषा २०२६ ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत परतुर आणि परिसरातील इयत्ता नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

ही स्पर्धा तोंडी आणि डिजिटल स्वरूपात घेण्यात आली होती. स्पर्धेत ऑपरेशन सिंदूर या विषयावर प्रश्न विचारण्यात आले होते. या स्पर्धेत विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. प्रसंगी ववेिकानंद इंग्लिश स्कूल सेलू रोड परतुर येथिल इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे संस्थापक डॉ शेषराव बाहेकर अध्यक्ष, संदीप दादा बाहेकर श्रीमती शिंदे मॅडम ववेिकानंद शाळेचे मुख्याध्यापक संतोष चाको.मुख्याध्यापक , विजयकुमार दंदाले. महाजन यांनी विद्यार्थ्यांचे तथा मार्गदर्शक शिक्षक,जगदिश बाहुटे. यांचे अभिनंदन केले आणि पुढील प्रश्न मंजुषा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल परतुर येथिल ववेिकानंद शाळेच्या शिरपेचात आणखी एका यशरूपी मानाचा तुरा रोवला आहे.

## तुम्ही सांगाल ते विकासकाम करू

### नवनिर्वाचित नगरसेवक भास्कर दानवे यांचे आश्वासन



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पार्टीला दणदणीत विजय मिळाल्याबद्दल दत्त नगर, जालना येथे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी श्री. भास्कर आबा दानवे, सौ. सुशिला भास्करराव दानवे, सौ. पद्मा अजित मानधनी, सौ. ज्योती रवि सले व श्री. कल्याण भदनेकर यांचा नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. प्रतिक भैय्या दानवे तसेच प्रा. कपलि दहेकर, श्री. जागृती यादव, श्री. विनोद यादव, श्री. रवि सले, रावसाहेब जगताप, भगवानराव गुंजाळ आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

याप्रसंगी बोलताना नगरसेवक श्री. भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, दत्त नगर परिसरात यापूर्वी ड्रेनेज लाईन, सिमेंट रस्ते व विद्युतीकरणासह विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. तरी उर्वरित राहिलेली विकासकामे कामे पुढील काळात पूर्ण केली जातील अशी ग्वाही देण्यात आली.

या सत्कार सोहळ्याचे आयोजन श्री. संजय निकम, रवि जगताप, लक्ष्मण डकले, विठ्ठल ठोंबरे, राजेंद्र गजर, संजय राठोड, रेखा सिरसाठ, अभयकुमार यादव, राजेश व्यास, शिवाजी लेंडीकर, गजानन सोनवणे व सर्व नागरिक यांनी केल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

**संपादकीय** पान


# बलशाली भारत

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते. हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो. कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल.देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे. कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!




**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

## सांस्कृतिक मंत्र्यांच्या हस्ते देवेंद्र भुजबळ सन्मानित



**मुंबई -** मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती संवर्धनासाठी न्यूज स्टोरी टुडे पोर्टल देत असलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री आशिष शेलार यांच्याहस्ते या पोर्टलचे संपादक देवेंद्र भुजबळ यांचा विश्वभरारी फौंडेशन आणि नॅशनल लायब्ररी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्य संमेलनात उत्कृष्ट स्मृतिचिन्ह , सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. स्वागताध्यक्ष आमदार श्री पराग आळवणी, अध्यक्ष लेखक- कवी श्री किरण येले, संमेलनाच्या आयोजिका सौ लता गुठे आणि इतर मान्यवर, साहित्य रसिक या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री देवेंद्र भुजबळ यांनी,त्यांनी लिहिलेली ''आम्ही अधिकारी झालो'', ''करिअरच्या नव्या दिशा'', ''माध्यमभूषण'' आणि ''कला साहित्य भूषण'' ही पुस्तके श्री शेलार यांना भेट दिली. या संमेलनात विचार प्रवर्तक परिसंवाद, कवी संमेलन,गझल सादरीकरण, मनोरंजन पर बहारदार कार्यक्रम झाले.

## सुर्यकुमार तळपला; भारताने न्यूझीलंडचा वचपा काढला

**गुवाहाटी -** सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वात टीम इंडियानं न्यूझीलंडला तिसऱ्या टी २० मॅचमध्ये पराभूत केलं आहे. न्यूझीलंडनं पहिल्यांदा फलंदाजी करताना ९ बाद १५३ धावा केल्या होत्या. भारतानं हे आव्हान १० ओव्हरमध्ये पार केलं. भारतानं न्यूझीलंडला ८ विकेटनं पराभूत केलं. भारतासाठी दिलासादायक बाब म्हणजे सूर्यकुमार यादवनं सलग दुसऱ्या टी २० मॅचमध्ये अर्धशतक झळकावलं. सलामीवीर अभिषेक शर्मानं यानं १४ बॉलमध्ये अर्धशतक झळकावलं. या विजयासह भारतानं पाच सामन्यांच्या टी २० मालिकेत ३-० अशी वजियी आघाडी घेतली आहे. भारतानं या विजयासह वनडे मालिकेतील पराभवाचा वचपा काढला आहे.

**अभिषेक- सूर्या तळपले**

न्यूझीलंडनं भारताला विजयासाठी १५४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. भारतानं हे आव्हान १० ओव्हरमध्येच पार केलं. भारतानं १० ओव्हरमध्ये २ बाद १५५ धावा केल्या. अभिषेक शर्मा २० बॉलमध्ये ६८ धावा करुन नाबाद राहिला. तर, सूर्यकुमार यादवनं २६ बॉलमध्ये ५७ धावा केल्या. अभिषेक शर्मानं ५ षटकार आणि ७ चौकार मारले. तर, सूर्यकुमार यादवनं ३ षटकार आणि ६ चौकार मारले.

# केंद्राकडून पद्म पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाकडून २०२६ साठी पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. देशभरातून ५ जणांना पद्मविभूषण, १३ जणांना पद्मभूषण आणि ११३ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. विविध क्षेत्रातील त्या मान्यवरांचं प्राविण्य आणि सेवेसंदर्भात पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील पद्म पुरस्कार विजेत्यांची यादी

पद्मविभूषण

धर्मेंद्रसिंह देओल (मरणोत्तर) : कला

पद्मभूषण

अलका याग्निक : कला

पीयूष पांडे (मरणोत्तर) : कला

उदय कोटक : व्यापार आणि उद्योग

पद्मश्री

श्रीरंग देवबा लाड : कृषी

रोहित शर्मा : क्रीडा

सत्यनारायण नुवाल : व्यापार आणि उद्योग

रघूवीर खेडकर : कला

माधवन रंगनाथन : कला

जुझेर वासी : विज्ञान आणि अभियांत्रिकी

जनार्दन बापुराव बोथे : समाजकार्य

भिकल्या लाडक्या धिंडा :कला

अशोक खाडे : व्यापार आणि उद्योग

अर्मिडा फर्नांडिस : वैद्यकीय

पद्मविभूषण पुरस्कार विजेते

१ श्री. धर्मेंद्र सिंह देओल (मरणोत्तर) - महाराष्ट्र
२ श्री. के. टी. थॉमस - केरळ
३ सौ. एन. राजम - उत्तर प्रदेश
४ श्री. पी. नारायणन - केरळ
५ श्री. व्ही. एस. अच्युतानंदन - केरळ

पद्मभूषण पुरस्कार विजेते

पद्म भूषण (१३)

६ सौ. अल्का याज्ञिक - महाराष्ट्र
७ श्री. भगतसिंग कोश्यारी - उत्तराखंड
८ श्री. कल्लिपट्टी रामास्वामी पलानीस्वामी - तामिळनाडू
९ श्री. मामूट्टी कला - केरळ
१० डॉ. नोरी दत्तात्रेयुडू- अमेरिका
११ श्री. पियुष पांडे (मरणोत्तर) - महाराष्ट्र
१२ श्री. एस. के. एम. मायलनंदन - तामिळनाडू
१३ श्री. शतावधानी आर. गणेश - कर्नाटक
१४ श्री. शिबू सोरेन (मरणोत्तर) - झारखंड
१५ श्री. उदय कोटक - महाराष्ट्र
१६ श्री. व्ही. के. मल्होत्रा (मरणोत्तर) - दिल्ली
१७ श्री. वेल्लापल्ली नटेशन - केरळ
१८ श्री. विजय अमृतराज - अमेरिका

पद्मश्री पुरस्कार विजेते

पद्मश्री (११३)

१९ श्री. ए. ई. मुत्थुनायगम - केरळ
२० श्री. अनिल कुमार रस्तोगी - उत्तर प्रदेश
२१ श्री. अंके गोवडा एम. - कर्नाटक
२२ अर्मिडा फर्नांडिस - महाराष्ट्र
२३ श्री. अरविंद वैद्य - गुजरात
२४ श्री. अशोक खाडे - महाराष्ट्र
२५ श्री. अशोक कुमार सिंग - उत्तर प्रदेश
२६ श्री. अशोक कुमार हलदार - पश्चिम बंगाल
२७ श्री. बलदेव सिंग - पंजाब
२८ श्री. भगवंदास रायकवार - मध्य प्रदेश
२९ श्री. भारत सिंग भारती - बिहार
३० श्री. भिखल्या लाडक्या ढिंढा - महाराष्ट्र
३१ श्री. बिश्वा बंधू (मरणोत्तर) - बिहार
३२ श्री. ब्रिज लाल भट - जम्मू व काश्मीर
३३ श्री. बुद्धा रश्मी मणी उत्तर प्रदेश
३४ डॉ. बुद्धी ताती - छत्तीसगड
३५ डॉ. चंद्रमौलि गड्डामणुगू - तेलंगणा
३६ श्री. चरण हेंब्रॉम - ओडिशा
३७ श्री. चिरंजी लाल यादव - उत्तर प्रदेश
३८ सौ. दीपिका रेड्डी - तेलंगणा
३९ श्री. धर्मिकलाल चुनिलाल पंड्या - गुजरात
४० श्री.गड्डे बाबू राजेंद्र प्रसाद - आंध्र प्रदेश
४१ श्री. गफुरुद्दीन मेवाजी जोगी - राजस्थान
४२ श्री. गंभीर सिंग योंझोन - पश्चिम बंगाल
४३ श्री. गरिमेला बालकृष्ण प्रसाद (मरणोत्तर) - आंध्र प्रदेश
४४ सौ. गायत्री बालसुब्रमण्यम आणि सौ. रंजनी बालसुब्रमण्यम (दुहेरी) - तामिळनाडू
४५ श्री. गोपाल जे. त्रिवेदी - बिहार
४६ श्री. गूडूरू वेंकट राव - तेलंगणा
४७ श्री. एच. व्ही. हांडे - तामिळनाडू
४८ श्री. हॅली वार - मेघालय
४९ श्री. हरी माधव मुखोपाध्याय (मरणोत्तर) - पश्चिम बंगाल
५० श्री. हिराचरण सैकिया - आसाम
५१ सौ. हरमनप्रीत कौर - पंजाब
५२ श्री. इंदरजीत सिंग सिधू - चंदीगड
५३ श्री. जानार्दन बापूराव बोथे - महाराष्ट्र
५४ श्री. जोगेश देऊरी - आसाम
५५ श्री. जुजेर वासी - महाराष्ट्र
५६ श्री. ज्योतिष देबनाथ - पश्चिम बंगाल
५७ श्री. के. पाजनिवेल - पुदुच्चेरी
५८ श्री. के. रामासामी - तामिळनाडू
५९ श्री. के. विजय कुमार - तामिळनाडू
६० श्री. कबिंद्र पुर्कायस्थ (मरणोत्तर) - आसाम
६१ श्री. कैलाश चंद्र पंत - मध्य प्रदेश
६२ सौ. कलामंडलम विमला मेनन - केरळ
६३ श्री. केवल कृष्ण ठाकराल - उत्तर प्रदेश
६४ श्री. खेम राज सुंद्रीयाल - हरियाणा
६५ सौ. कोल्लकल देवकी अम्मा जी. - केरळ
६६ श्री. कृष्णमूर्ती बालसुब्रमण्यम - तेलंगणा
६७ श्री. कुमार बोस - पश्चिम बंगाल
६८ श्री. कुमारस्वामी थंगाराज - तेलंगणा
६९ प्रा. (डॉ.) लार्स-क्रिश्चन कोख - जर्मनी
७० सौ. ल्युडमिला विक्टोरोव्ना खोखलोव्हा - रशिया
७१ श्री. माधवन रंगनाथन - महाराष्ट्र
७२ श्री. मगंती मुरली मोहन - आंध्र प्रदेश
७३ श्री. महेंद्र कुमार मिश्रा - ओडिशा
७४ श्री. महेंद्र नाथ रॉय - पश्चिम बंगाल
७५ श्री. मामिडाला जगदीश कुमार - दिल्ली
७६ सौ. मंगला कपूर - उत्तर प्रदेश
७७ श्री. मीर हाजीभाई कासंभाई - गुजरात
७८ श्री. मोहन नगर - मध्य प्रदेश
७९ श्री. नारायण व्यास - मध्य प्रदेश
८० श्री. नरेश चंद्र देव वर्मा - त्रिपुरा
८१ श्री. निलेश विनोदचंद्र मंडलवाला - गुजरात
८२ श्री. नुरुद्दीन अहमद - आसाम
८३ श्री. ओथुवार थिरुथणी स्वामिनाथन - तामिळनाडू
८४ डॉ. पद्मा गुरमेट - लडाख
८५ श्री. पालकोंडा विजय आनंद रेड्डी - तेलंगणा
८६ सौ. पोखिला लेखनी - आसाम
८७ डॉ. प्रभाकर बसवराजभाऊ कोरे - कर्नाटक
८८ श्री. प्रतीक शर्मा - अमेरिका
८९ श्री. प्रविण कुमार - उत्तर प्रदेश
९० श्री. प्रेम लाल गौतम - हिमाचल प्रदेश
९१ श्री. प्रोसेनजित चॅटर्जी - पश्चिम बंगाल
९२ डॉ. पुन्नामूर्ती नटेसन - तामिळनाडू
९३ श्री. आर. कृष्णन (मरणोत्तर) - तामिळनाडू
९४ श्री. आर. व्ही. एस. मणी - दिल्ली
९५ श्री. रबीलाल टुडु - पश्चिम बंगाल
९६ श्री. रघुपत सिंग (पश्चात्तापीन) - उत्तर प्रदेश
९७ श्री. रघुवीर तुकाराम खेड़कर - महाराष्ट्र
९८ श्री. राजाजपट्टी केलीअप्पा गौंदर - तमिळनाडू
९९ श्री. राजेंद्र प्रसाद - उत्तर प्रदेश
१०० श्री. रामा रेड्डी मामिडी (पश्चात्तापीन) - तेलंगणा
१०१ श्री. राममूर्ती स्रीधर - दिल्ली
१०२ श्री. रामचंद्र गोडबोले आणि सुनीता गोडबोले (दुयु) - छत्तीसगढ
१०३ श्री. रतीलाल बोरीसागर - गुजरात
१०४ श्री. रोहित शर्मा - महाराष्ट्र
१०५ सुश्री. एस. जी. सुषीलम्मा - कर्नाटक
१०६ श्री. सांग्युसंग एस. पोंगेनर - नागालँड
१०७ संत निरंजन दास - पंजाब
१०८ श्री. सरत कुमार पात्रा - ओडिशा
१०९ श्री. सरोज मंडल - पश्चिम बंगाल
११० श्री. सतीश शाह (पश्चात्तापीन) - महाराष्ट्र
१११ श्री. सत्यनारायण नुवाल - महाराष्ट्र
११२ सुश्री. सविता पुनिया - हरियाणा
११३ प्रा. शफी शौक - जम्मू आणि काश्मीर
११४ श्री. शशी शेखर वेम्पती - कर्नाटका
११५ श्री. श्रीरंग देवाबा लाड - महाराष्ट्र
११६ मिस. शुभा वेंकटेशा आयंगर - कर्नाटका
११७ श्री. श्याम सुंदर - उत्तर प्रदेश
११८ श्री. सिमंचल पात्रो - ओडिशा
११९ मिस. सिवसंकरी - तमिळनाडू
१२० डॉ. सुरेश हनगवाडी - कर्नाटका
१२१ स्वामी ब्रह्मदेव जी महाराज - राजस्थान
१२२ श्री. टी. टी. जगन्नाथन (पोथुमस) - कर्नाटका
१२३ श्री. टागा राम भेल - राजस्थान
१२४ श्री. तरुण भट्टाचार्य - पश्चिम बंगाल
१२५ श्री. टेचि गबिन - अरुणाचल प्रदेश
१२६ श्री. थिरुवरूर बख्तवाथसलाम - तमिळनाडू
१२७ मिस. त्रिप्ती मुखर्जी - पश्चिम बंगाल
१२८ श्री. वीझिनाथन कामकोटी - तमिळनाडू
१२९ श्री. वेम्पती कुटुम्ब शास्त्री - आंध्र प्रदेश
१३० श्री. व्हादिमीर मेस्तिवरिश्विली (पोथुमस) - जॉर्जिया
१३१ श्री. युमन जनत्रा सिंग (पोथुमस) - मणिपूर

### प्रजासत्ताक दिन विशेष : अधिकारांच्या उत्सवात कर्तव्याचे

# भानच ठरेल राष्ट्रनिर्मितीचा पाया !

२६ जानेवारी १९५० रोजी भारताने संविधानाचा स्वीकार केला आणि भारत एक सार्वभौम, प्रजासत्ताक राष्ट्र बनले. दरवर्षी हा दिवस आपण मोठ्या दिमाखात साजरा करतो. संविधानाने आपल्याला प्रगत लोकशाहीतील सर्वश्रेष्ठ अधिकार दिले आहेत; मात्र आज ७ दशकांनंतर आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे की, आपण अधिकारांचा उपभोग घेताना आपल्या कर्तव्यांना न्याय दिला आहे का? राष्ट्र केवळ कागदी कायद्यांनी नाही, तर नागरिकांच्या कर्तव्यभावनेने समृद्ध होते. अधिकारांचा आग्रह धरणारा नागरिक स्वतःपुरता विचार करतो, पण कर्तव्याचे पालन करणारा नागरिक हा राष्ट्रकेंद्रित असतो. म्हणूनच आजच्या जागतिक परिस्थितीत अधिकारांपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे, ही काळाची गरज बनली आहे.

जागतिक संघर्ष आणि भारतापुढील आव्हाने : आज संपूर्ण विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. रशिया-युक्रेन असो वा इस्रायल-हमास संघर्ष, जगातील अस्थिरतेचा परिणाम भारतावरही होत असतो. आजचे युद्ध केवळ सीमेवर बंदुकीने लढले जात नाही, तर ते हायब्रीड वॉरच्या स्वरूपात आपल्या घरात शिरले आहे. सायबर हल्ले, आर्थिक युद्ध, सांस्कृतिक आक्रमणे, अमली पदार्थांची तस्करी आणि अर्बन नक्षलवादासारखी अंतर्गत आव्हाने आपल्या समोर उभी आहेत. या छुप्या आघाड्यांवर लढण्यासाठी केवळ सैन्य पुरेसे नाही, तर प्रत्येक नागरिकाचे सतर्क राहणे आवश्यक आहे. ही सतर्कता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक कर्तव्य : देशाची अर्थव्यवस्था बळकट करणे हे केवळ सरकारचे काम नसून ते नागरिकांचे कर्तव्य आहे. आत्मनिर्भर भारत ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी स्वदेशी उत्पादनांचा आग्रह धरणे, करप्रणालीचे प्रामाणिक पालन करणे आणि राष्ट्रविरोधी शक्तींच्या आर्थिक नाड्या आवळणे आवश्यक आहे. जेव्हा आपण परदेशी वस्तूंच्या जागी स्वदेशी वस्तू निवडतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे भारताच्या संरक्षण व्यवस्थेला आणि अर्थव्यवस्थेला बळकट करत असतो. ''प्रत्येक नागरिक एक सैनिक'' या भावनेतून केलेली प्रत्येक छोटी कृती राष्ट्रनिर्मितीला हातभार लावते.

राष्ट्रध्वजाचा सन्मान : श्रद्धेचा की केवळ सवयीचा? : प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आपण तिरंग्याला वंदन करतो; परंतु त्या सन्मानाचे सातत्य किती काळ टिकते? २६ जानेवारीच्या दुपारीच रस्त्यांवर, कचराकुंडीत किंवा नाल्यात प्लास्टिकचे आणि कागदी राष्ट्रध्वज पडलेले दिसतात, हे पाहून कोणत्याही राष्ट्रप्रेमी नागरिकाचे हृदय पिळवटून निघते. अनेकजण उत्साहाच्या भरात राष्ट्रध्वजाच्या रंगाचा केक कापतात किंवा कपड्यांवर, चेहऱ्यावर तिरंगा रंगवतात. हा राष्ट्रध्वजाचा घोर अपमान आहे.




भारतीय ध्वजसंहितेचे (     ) पालन करणे हे आपले कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. तसेच, काही आंतरराष्ट्रीय संकेतस्थळांवर भारताचा नकाशा चुकीचा दाखवला जातो, ज्यात काश्मीर किंवा अरुणाचल प्रदेशचा भाग वगळला जातो. अशा वेळी केवळ मूकदर्शक न राहता, संबंधित संस्थेला पत्र लिहून किंवा कायदेशीर मार्गाने निषेध नोंदवून तो नकाशा दुरुस्त करून घेणे, हे आपले जागरूक नागरिक म्हणून पहिले कर्तव्य आहे.

प्रजासत्ताक दिनी नागरिक म्हणून काय करावे? : प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ सुट्टीचा दिवस नव्हे, तर तो कर्तव्य संकल्प करण्याचा दिवस आहे. त्यासाठी खालील कृती आपण अवश्य कराव्यात :

१. प्लास्टिकच्या ध्वजांचा वापर पूर्णपणे टाळावा आणि राष्ट्रध्वजाचा कुठेही अवमान होत असल्यास तो धैर्याने रोखावा. ध्वज संहितेचे पालन करावे

२. केवळ ठराविक नेत्यांचीच नव्हे, तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांचे चरित्र अभ्यासावे आणि त्यांचे मूल्य संस्कार पुढच्या पिढीला द्यावेत. यातून क्रांतिकारकांचे स्मरण करावे

३. केवळ अधिकार मागण्यासाठी नव्हे, तर शिस्तबद्ध नागरिक म्हणून रहदारीचे नियम पाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि भ्रष्टाचाराला विरोध करणे हा देखील प्रजासत्ताक दिनाचा सन्मानच आहे. यातून संविधान आणि नियमांचा आदर राखावा.

४. आपली संस्कृती, भाषा आणि राष्ट्रप्रतीकांचा (राष्ट्रगीत, वंदे मातरम्) सन्मान राखणे आणि त्याचा अवमान करणाऱ्यांना प्रबोधन करणे हे आपले कर्तव्य आहे.

ज्या देशाचा नागरिक आपल्या अधिकारांपेक्षा कर्तव्याला श्रेष्ठ मानतो, तो देश जगात अजिंक्य ठरतो. स्वातंत्र्य मिळवून देणे ही क्रांतिकारकांची जबाबदारी होती, पण ते स्वातंत्र्य टिकवणे आणि समृद्ध करणे ही आपली जबाबदारी आहे. या प्रजासत्ताक दिनी आपण संकल्प करूया की, ''मी केवळ माझ्या हक्कासाठी लढणारा नागरिक न राहता, राष्ट्राच्या सन्मानासाठी अखंड कार्यरत असणारा सैनिक बनेन.''

जय हिंद ! जय भारत !

**संकलक - श्री. रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती**

## न्यायव्यवस्थेत ५०% भ्रष्टाचार, न्यायाधीश नोकरशहा झालेत; आता पक्षकारांनीच उठाव करावा! ॲड. महेश एस. धन्नावत

**मुंबई** - ''न्यायव्यवस्थेमध्ये तब्बल ५० टक्क्यांपर्यंत भ्रष्टाचार मुरला असून अनेक न्यायाधीश हे आता न्यायाधीश न राहता केवळ फाईल पुढे ढकलणारे नोकरशहा बनले आहेत. खुर्ची-टेबल आणि साधा स्टेनोग्राफरही नसलेल्या न्यायालयांकडून न्यायाची अपेक्षा कशी करणार? हे विदारक सत्य मी नाही, तर एका माजी मुख्य न्यायमूर्तींनीच मांडले आहे. आता या व्यवस्थेविरोधात पीडित पक्षकारांनीच आवाज उठवण्याची वेळ आली आहे,'' अशा स्फोटक शब्दांत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी देशभरातील पक्षकारांना संघटित होण्याचे आवाहन केले आहे.

जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती बशीर अहमद खान यांनी एका मुलाखतीत भारतीय न्यायव्यवस्थेच्या ढासळलेल्या स्तरावर आणि त्यातील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले आहे. त्यांच्या या मुलाखतीचा आधार घेत ॲड. धन्नावत यांनी न्यायव्यवस्थेच्या सद्यस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

ॲड. धन्नावत म्हणाले, ''माजी मुख्य न्यायमूर्ती खान यांनी जे सांगितले, ते प्रत्येक पक्षकार आणि वकील दररोज अनुभवत आहे. न्यायमूर्ती खान स्पष्टपणे सांगतात की, न्यायव्यवस्थेत भ्रष्टाचार आहे आणि तो २० ते ५० टक्क्यांपर्यंत असू शकतो. 'कुणीही दुधाने धुतलेले नाही,' हे त्यांचे विधान व्यवस्थेतील कीड किती खोलवर पसरली आहे, हे दाखवते. जेव्हा न्यायमूर्तीच भ्रष्टाचाराची कबुली देतात, तेव्हा सामान्य माणसाने न्यायासाठी कोणाकडे पाहावे?''

न्यायमूर्ती खान यांनी आपल्या मुलाखतीत न्यायालयांच्या दुरवस्थेचे वर्णन केले आहे. अनेक कनिष्ठ न्यायालयांमध्ये न्यायाधीशांना बसायला खुर्ची नाही, ते कापसाच्या बॉक्सवर बसून निकालपत्र लिहितात. स्टेनोग्राफर नसल्याने पाच तासांत एक निकाल लिहिला जातो, तेवढ्या वेळेत पाच खटले निकाली काढता आले असते. यावर ॲड. धन्नावत यांनी म्हटले की, ''सरकार न्यायव्यवस्थेला प्राधान्य देत नाही. अर्थसंकल्पात सर्वात कमी तरतूद न्यायव्यवस्थेसाठी असते. जर न्यायाधीशांनाच मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर ते पक्षकारांना जलद न्याय कसा देणार? या असुविधांचा थेट फटका सामान्य पक्षकाराला बसतो, ज्याचा खटला वर्षानुवर्षे केवळ अशा कारणांमुळे प्रलंबित राहतो.''

''आज ८० ते ९० टक्के न्यायाधीश हे नोकरशहा झाले आहेत. ते फक्त फाईल इकडून तिकडे ढकलतात. त्यांना पक्षकाराच्या वेदनेशी काहीही देणेघेणे नाही,'' या न्यायमूर्ती खान यांच्या विधानावर जोर देत ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, ''आज न्यायालयांमध्ये न्यायिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. केवळ दिवसाला दहा प्रकरणे निकाली काढली म्हणजे न्यायाधीश कार्यक्षम ठरत नाही. त्या निकालाने न्याय झाला की नाही, हे महत्त्वाचे आहे. मात्र, आजकाल फक्त तारखा दिल्या जातात. मोठ्या वकिलांचे इंग्रजी ऐकून न्यायाधीश प्रभावित होतात, पण सामान्य माणसाची बाजू ऐकून घेतली जात नाही. ही नोकरशाही वृत्तीच न्यायदानाला लागलेली सर्वात मोठी कीड आहे.''

ॲड. धन्नावत यांनी शेवटी पक्षकारांना भावनिक आवाहन करताना म्हटले की, ''आतापर्यंत तुम्ही शांत राहिलात, व्यवस्थेवर विश्वास ठेवलात. पण आता माजी मुख्य न्यायमूर्तींनीच व्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. भ्रष्टाचार, सुविधांचा अभाव आणि न्यायाधीशांची उदासीनता यांमुळे तुमचे आयुष्य पणाला लागले आहे. तुमच्या पिढ्यानपिढ्या न्यायालयाच्या पायऱ्या झिजवत आहेत. त्यामुळे आता गप्प बसू नका. आपल्या हक्कांसाठी आवाज उठवा. या 'तारीख पे तारीख'च्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी आणि जलद व निःपक्षपाती न्यायासाठी संघटित व्हा. नोटरी असोसिएशन तुमच्या या लढ्यात तुमच्यासोबत आहे.''

## मित्रांनीच केला मित्राचा खून!

### जालना जिल्ह्यात पारनेरमध्ये घरात घुसून चाकूने वार, तरुणाची निर्घृण हत्या

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील पारनेर येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. मित्रांनीच मित्राचा चाकूने वार करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

या घटनेत पवन बोराटे (रा. पारनेर) या तरुणाची हत्या करण्यात आली आहे. मयत पवनच्या ५ ते ६ मित्रांनी घरात घुसून त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करत त्याचा जागीच जीव घेतल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला होता.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार

पवन संतोष बोराटे (वय १८ वर्ष) असे मयत तरुणाचे नाव आहे. आरोपीच्या बहिणीला चिठ्ठी दिल्याच्या किरकोळ कारणातून ही घटना घडल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. काल रात्रीच्या सुमारास संशयित आरोपी राहुल खरे याने पवन बोराटे याच्या पोटात चाकूने गंभीर वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पवन याने राहुल खरेच्या बहिणीला काहीतरी चिठ्ठी दिली होती. या कारणावरून रागाच्या भरात आरोपी राहुल खरे याने पवन यास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि हत्या करण्याच्या उद्देशाने पवनच्या पोटात चाकूने दोन गंभीर वार केले. या प्रकरणी मयताचे वडील संतोष बोराटे (वय ४५ वर्ष) यांच्या तक्रारीवरून अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. तसेच आरोपीला ताब्यात घेतल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आरोपीला तात्काळ अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मयताच्या नातेवाईकांनी केली आहे. दरम्यान, आज आला नाही शवविच्छेदनानंतर मयताचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.



# तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले दर्शन







**नांदेड । प्रतिनिधी -** तखत सचखंड श्री हजूर अबलचल नगर साहिबजी गुरुद्वाराचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दर्शन घेतले. त्यांच्यासह आंध्रप्रदेश उपमुख्यमंत्री कोनिडला पवन कल्याण, महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार तुषार राठोड, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर, अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य चरणदीप सिंघ आर्दीनीही दर्शन घेतले. गुरुद्वारा बोर्डाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्री, लोकप्रतिनिधी, मान्यवर यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ जी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोपीय कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोपीय कार्यक्रम शेगांव (खुर्द) येथे दिनांक २५ जानेवारी २०२६ ला '' सशक्त भारतासाठी युवाशक्ती शिबिर '' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन तथा राष्ट्रीय सेवा योजनेच्या गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य सौ. राधा सवाने, सरपंच मोहित लभाने, उपसरपंच सौ. उषा जीवतोडे, प्रा. मोक्षदा नाईक, पोलीस पाटील सौ. स्वाती नन्नावरे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष धीरज वैरागडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजय कायरकर, प्रमुख उपस्थिती प्रतिष्ठित नागरिक चंद्रशेखर भिवदरे, अनुप नन्नावरे, केंद्रप्रमुख उराडे सर, मुख्याध्यापक अनिल मत्ते, राजू मांडवकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेश राठोड आणि प्रा. डॉ. धनश्री पंचभाई या मान्यवरांची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. मृणाल काळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त असून समाजसेवेची जाणीव निर्माण करणारी चळवळ असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी समाजातील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यावर उपाय शोधण्याची भूमिका घ्यावी,

स्वयंसेवकांमध्ये सेवाभाव, नेतृत्वगुण व सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्ती निर्माण होते, तसेच शिबिरादरम्यान केलेल्या स्वच्छता, जनजागृती व सामाजिक उपक्रमांमुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला हातभार लागल्याचेही त्यांनी प्रतिपादन केले. उपप्राचार्य सौ. राधा सवाने यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होत असून मूल्याधिष्ठित शिक्षण अधिक सक्षम होते, असे नमूद केले. सरपंच मोहित लभाने यांनी स्वयंसेवकांच्या उपक्रमांमुळे गावाच्या स्वच्छता व विकासात सकारात्मक बदल घडल्याचे सांगून ग्रामविकासात युवकांचा सहभाग वाढावा, व विद्यार्थ्यांनी सामाजिक उपक्रमांत पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले. तंटामुक्ती समिती अध्यक्ष धीरज वैरागडे यांनी संवादातून व समन्वयातून तंटामुक्त समाजनिर्मिती शक्य असल्याचे सांगितले. शिक्षणासोबत संस्कारांची जोड देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

प्रतिष्ठित नागरिक चंद्रशेखर भिवदरे यांनी युवकांनी समाजसेवेला जीवनाचा अविभाज्य भाग बनवावा, राष्ट्रउभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमांमध्ये शिबिराला केलेल्या सहकार्याबद्दल महाविद्यालयातर्फे सरपंच मोहित लगाने, पोलीस पाटील स्वाती नन्नवरे, चंद्रशेखर भिवदरे,धीरज वैरागडे राजू मांडवकर, लक्ष्मण गायकवाड,अनुप नन्नवरे यांचा सत्कार करण्यात आला.

तसेच गावकऱ्यांकडून प्राचार्य डॉ. मृणाल काळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेश राठोड

प्रा.नीरज आत्राम,प्रा. डॉ.





धनश्री पंचभाई यांचा सत्कार करण्यात आला. हा शिबिर १९ जानेवारी २०२६ ते २५ जानेवारी २०२६ या दरम्यान घेण्यात आला. या कार्यक्रमाची प्रस्तावना तथा अहवाल वाचन प्रा. सुरेश राठोड यांनी केले तर उत्कृष्ट सूत्रसंचालन प्रा. नीरज आत्राम यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. धनश्री पंचभाई यांनी केले. शिबिरातील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन करण्यासाठी प्राध्यापकवृंद, ग्रामपंचायत शेगाव खुर्द, ग्रामवासी, स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाला प्रा. हेमंत परचाके, प्रा. वराडे प्रा.तिलक ढोबळे, प्रा. गौरव चौधरी प्रा.चेतन गावंडे, शंकर पर्बत तसेच बहुसंख्येने गावकरी उपस्थित होते. मान्यवरांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# जालना पीपल्स बँकेच्या महिला शाखेत संक्रांतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम



**जालना । प्रतिनिधी -** जालना पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या महिला शाखेत महिला संचालिका सुनंदा नंदकिशोर अग्रवाल आणि वर्षा महेश भक्कड यांच्या पुढाकाराने संक्रांतीच्या निमित्ताने भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी सुनंदा अग्रवाल, वर्षा भक्कड यांनी उपस्थित महिलांचे स्वागत केले. याप्रसंगी तिळगुळ, हळदी-कुंकू आणि सांस्कृतिक सादरीकरणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. हळदी-कुंकूच्या माध्यमातून पारंपरिक उत्सव साजरा करत महिलांनी एकमेकांना तिळगुळ दिला. बँकेच्यावतीने वाण स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या. पारंपरिक पोशाख परिधान करून महिलांनी उत्सवाचे सौंदर्य वाढवले. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे वातावरण रंगतदार झाले. महिला संचालकांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमाने सामाजिक एकता आणि परंपरांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी कल्पना लाहोटी, संतोष पंच, ममता भक्कड़, शैला भक्कड़, निर्मला करवा, अनिता अग्रवाल, ज्योती अग्रवाल, सीमा पित्ती, अनीता पित्ती, मंगल मालपानी, निशा पंच, श्रद्धा नागोरी, प्रियंका कामड, कांता दायमा, संगीता बियानी, उज्वला सेठी, मंजू जोशी, शोभा पंचारिया यांच्या सम महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# दानकुंवर महाविद्यालयात नरहर कुरुंदकर व्याख्यानमालेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील दानकुंवर महिला महाविद्यालय आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २८ जानेवारी रोजी जालना शहरात नरहर कुरुंदकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी सकाळी ११ वाजता दानकुंवर महिला महाविद्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहात आयोजित व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी श्रीमती दानकुंवर हिंदी कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्रकुमार गुप्ता यांची उपस्थिती असणार आहे. अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.राम रौनेकर प्रमुख वक्ते असणार आहेत. संस्थेचे संचालक मंडळ आणि संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी डॉ विद्या पटवारी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे. या व्याख्यानमालेचा जालनाकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन आवाहन संयोजक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ जितेंद्र अहिरराव, समन्वयक डॉ.वासुदेव उगले, प्रा. अशोक गारकर यांनी केले आहे.

### हिंद-दी-चादर समागम कार्यक्रमात भाविकांची अलोट गर्दी''

# 'बोले सो निहाल सत श्री अकाल च्या जयघोषात लाखो भाविकांनी घेतले दर्शन



**नांदेड । प्रतिनिधी -** ''हिंद-दी-चादर'' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांसह लाखो भाविकांनी ''वाहे गुरु'' व ''बोले सो निहाल सत श्री अकाल'' च्या जयघोषात श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

आज दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे.

देशातील विविध राज्यातून आलेल्या सर्व धर्माच्या भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत.

**भाविकांच्या सोयीसाठी** आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी भाविकांसाठी लोकसहभागातून चहा, अल्पोपहार, ज्यूस, विविध स्टॉल उभारण्यात आलेले आहेत.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, धर्मनिष्ठा व मानवतेच्या संदेशाचे स्मरण या शहीदी समागमाच्या माध्यमातून करण्यात येत असून या कार्यक्रमातून समाजात बंधुता व एकतेचा संदेश दिला जात आहे.

# जालन्यात संतापाचा उद्रेक! चरण रायमलचा मृतदेह थेट एसपी ऑफिसला नेला

## नातेवाईकांचा दीड तास ठिय्या, मास्टरमाईंड आणि पिस्तूल पुरवणाऱ्यावर कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** आज दिनांक २५ रविवार रोजी सकाळी आठ वाजता मिळालेल्या माहितीनुसार नूतन वसाहत भागात झालेल्या चरण रायमल हत्याकांडाचे पडसाद शनिवारी रात्री उमटले. आरोपींना अटक झाली असली तरी, या हत्येमागचा मुख्य सूत्रधार कोण आणि त्यांना शस्त्रे कोणी पुरवली? या प्रश्नांवरून संतप्त नातेवाईकांनी चरणचा मृतदेह थेट पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर नेऊन दीड तास ठिय्या मांडला. या प्रकारामुळे पोलीस प्रशासन आणि नातेवाईकांमध्ये मोठा तणाव निर्माण झाला होता.

पोलिसांनी दोन हल्लेखोर अजय आमलेकर आणि अमन धिल्लोड यांनाअटक केली असली, तरी नातेवाईकांचे समाधान झालेले नाही. ही हत्या केवळ दोन जणांनी केलेली नसून, यामागे कोणीतरी मोठा मास्टरमाईंड आहे, त्याला तात्काळ अटक करा, जालन्यात गावठी कट्टे आले कुठून?



पिस्तूल सप्लाय करणाऱ्यावरही कडक कारवाई करून गुन्हा दाखल करा, भररस्त्यात गोळीबार करणाऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी नातेवाईकांनी केली. मृददेह पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आणल्यानंतर नातेवाईकांनी पोलीस प्रशासनाविरुध्द संताप व्यक्त केला. जोपर्यंत पोलीस अधीक्षक स्वतः ठोस आश्वासन देत नाहीत आणि मुख्य सूत्रधाराचे नाव समोर येत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा नातेवाईकांनी घेतला होता. अखेर उपविभागिय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी मध्यस्थी करत, निष्पक्ष तपास आणि शस्त्र पुरवठादारांचा शोध घेण्याचे आश्वासन दिल्यानंतर संतप्त नातेवाईक शांत झाले. भररस्त्यात झालेल्या या हत्येमुळे जालन्यातील कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पिस्टल कल्चर जालन्यात पुन्हा डोके वर काढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलीस आता या प्रकरणाचे धागेदोरे कोणापर्यंत पोहोचतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.